# ......आणि अश्रुंचा बांध फुटला

रमेश थोरात
कार्यकारी अभियंता ,
पारस विस्तारीत प्रकल्प,



(दिवंगत अभिनयसम्राट कै.निळू फुले यांना महानिर्मितीच्या रमेश थोरात या अभियंत्याने वाहिलेली ही श्रध्दांजली.)

नटश्रेष्ठ सिनेकलावंत निळू फुले.अंधश्रध्देचा कर्दनकाळ निळू फुले,
सामाजिक कार्यकर्ता निळू फुले..फिल्मी खलनायक निळू फुले
निगर्वी निळू फुले..पिडीतांचा आधार निळू फुले,
साधासुधा निळू फुले,..प्रेरणास्रोत निळू भाऊ

निळूभाऊ आणि मी दोघेही नातेवाईक नाही,सोयरे नाही एक मात्र खरं, आम्हा दोघांचीही जात एकच ती म्हणजे कलावंताची जात. कलेला धर्माचे बंधन नसते,जातीचे बंधन नसते,समाजाचे बंधन नसते,कला ही मुक्त आहे. भाऊंची आणि माझी ओळखही कलेतूनच झाली आणि तीही नटसम्राटमधील गणपतराव बेलवलकरमुळे आणि खरोखरच नटसम्राट निळू फुलेंनी मला कलावंताच्या पंक्तीत नेऊन बसविले.नागपूरच्या नाटय स्पर्धेत 'नटसम्राट' प्रस्तुत झाले. प्रयोग फार छान रंगला होता. लोकमतच्या नागपूर सह महाराष्ट्राच्या सर्व आवृत्त्यांमध्ये 'बिंब-प्रतिबिंब' हया सदराखाली बातमी झळकली. 'ग्रामीण कलावंतामध्येही नटसम्राट आहेत' हया मथळयाखाली दिलेली बातमी नटश्रेष्ठ निळू भाऊंच्या नजरेतून सुटली नाही. त्यांनी स्वत: पत्र लिहून आप्पा बेलवलकर समर्थपणे उभा केल्याबद्दल माझे अभिनंदन केले.तेंव्हापासून निळू भाऊ माझे मोठे भाऊ झालेत. 'नाती काही केवळ रक्ताचीच नसतात, कलेवर प्रेम करणारे सुध्दा जिव्हाळयाचे बनतात' हया चारोळीप्रमाणे मी भाऊंना दिलेले निमंत्रण त्यांनी नाकारले नाही. उर्जानगरला २ वेळा, खापरखेडा २ वेळा, पारस विस्तारीत प्रकल्प विद्युतनगरला २ वेळा,माझ्या जन्मगावी (माटोडा),जि.बुलढाणा या खेडेगावी एक वेळा माझेसाठी येऊन गेले आणि भरभरून आशिर्वाद देऊन गेले. 'कचऱ्या हिंदुस्थानी' चे बीज उत्तम आहे,लिहून पुर्ण करून थांबू नकोस,प्रयोग सुध्दा सुरू कर आणि त्यांच्या आशिर्वादाने ६५६ प्रयोग झालेत त्यातील ७ प्रयोगांना भाऊ प्रत्यक्ष हजर होते. त्यांनी स्वत:च्या अक्षरात माझ्या पुस्तकांसाठी प्रस्तावना पाठविल्या आणि त्यांच्याच प्रेरणेने 'अभिनय' आणि दहा पथनाटयाचे पुस्तक 'दशक' प्रकाशित केले. पुण्याला गेलो म्हणजे भाऊ आणि सौ.रजनी वहिनी मुलाप्रमाणे घरीच राहायला सांगत. परवा पुण्याला भेटायला गेलो तेव्हा हा पहाडाएवढा धिप्पाड कलावंत १७० चित्रपट आणि असंख्य नाटके गाजवून जहांगीर हॉस्पिटलमध्ये कॅन्सरच्या आजाराने निपचित पडलेला पाहिला आणि अश्रुंचा बांध फुटला.सौ.रजनी वहिनीही माझ्यासोबत रडू लागल्या. गुरूवर्य निळू भाऊंचे चरणस्पर्श करून दर्शन घेतले. सौ. रजनी वहिनींनी भाऊंचा हात माझ्या डोक्यावर छत्रासारखा ठेवून आशिर्वाद दिला आणि या कलाक्षेत्रातील शुर सैनिकाला मानाचा मुजरा केला. निळूभाऊंच्या नावाखाली संपूर्ण देशामधून एकमेव अशी 'नटश्रेष्ठ निळू फुले आर्ट फाउंडेशन' या संस्थेची मी स्थापना केली आहे. निळू भाऊंचे अपुरे स्वप्न,अपु-या राहिलेल्या इच्छा हया संस्थेव्दारे पुर्ण करण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन. निळूभाऊंनी अगदी शेवटच्या प्रवासातही आशिर्वाद देवून कर्णासारखं दातृत्व दाखविलं आणि कालक्षेत्रातील हा दिग्गज महामेरू आम्हाला सोडून दि.१३ जुलै २००९ रोजी सकाळी पाऊणे दोन वाजता निघुन गेला. मात्र त्यांच्या प्रेरणेने आणि आशिवार्दाने आम्ही त्यांच्या स्मृतीची आठवण ठेऊन सतत कार्यरत राहू.

निळूभाऊंना अभिनयाचा सहावा सेन्स ठाऊक होता. म्हणून त्यांचा अभिनय उच्च दर्जाचा होता. एकदा निळूभाऊंना पुण्याला भेटायला गेलो. रात्री बालगंधर्वला नटश्रेष्ठ नसीरूद्दीन शाह आणि त्यांची मुलगी यांचा शो होता. भाऊ मला सोबत घेऊन गेले.नसिरूद्दीनला जसं समजलं, निळू भाऊ आले, ते भाऊंजवळ आले आणि चक्क भाऊंच्या पाया पडले आणि "निळूभाऊ आपका सखाराम बाईंडर मैने भी हिंदी मे किया लेकिन आपके जैसा मुझे जमा नही" अशी प्रांजळ कबुली त्यांनी दिली त्याच्यावरून भाऊंच्या अभिनयाची उंची समजते.

❖❖❖